JUMSAR

तुमसर

नगर रचना आणि मुल्यनिर्धारण विभाग

जा.क्र. वि.यो. तुमसर (सु)/टीपीव्ही-२/४९६१

मध्यवर्ती कार्यालय,
पुणे : १. दि. २० ऑगस्ट, १९९२

प्रति,

व्यवस्थापक,
शासकीय मुद्रणालय व ग्रंथागार,
नागपूर.

विषय :- विकास योजना तुमसर (सुधारित).
महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३१(१) अन्वये अंतिम मंजूरी देण्यासंबंधीची अधिसूचना राजपत्रात प्रसिध्द करणेबाबत.

तुमसर शहराच्या सुधारित विकास योजनेला महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३१(१) अन्वये अंतिम मंजूरी देण्यासंबंधीच्या अधिसूचनेची इंग्रजी व मराठी प्रत सोबत जोडलेली आहे. कृपया ही अधिसूचना महाराष्ट्र शासन राजपत्र, नागपूर विभागीय पुरवणी मध्ये तातडीने प्रसिध्द करावी. ही अधिसूचना शासन राजपत्रात दिनांक ३० सप्टेंबर, १९९२ पूर्वी प्रसिध्द होणे कायद्याच्या दृष्टीने आवश्यक आहे. सदर अधिसूचना प्रसिध्द झाल्यानंतर संबंधित राजपत्राच्या प्रत्येकी ५ प्रती खाली नमूद केलेल्या अधिकाऱ्यांना पाठवाव्यात.

१) संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२) उपसंचालक, नगर रचना, नागपूर विभाग, नागपूर.
३) नगर रचनाकार, भंडारा.
४) मुख्याधिकारी, तुमसर नगरपरिषद, तुमसर, जि. भंडारा.

TOWN PLANNING & VALUATION DEPTT.
BRANCH BHANDARA.
Inward No. 9638
Dated 9/9/92
File No. ....

(गुणवंत मदामे)
संचालक, नगर रचना,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

प्रत अधिसूचनेच्या प्रतीसह :-
१) मा. सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांना सादर.
२) मा. विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर.
३) जिल्हाधिकारी, भंडारा.
४) उपसंचालक, नगर रचना, नागपूर विभाग, नागपूर.
५) नगर रचनाकार, भंडारा शाखा, भंडारा.
६) मुख्याधिकारी, तुमसर नगरपरिषद, तुमसर, जि. भंडारा.

...

अधिसूचना

नगर रचना आणि मुल्यनिर्धारण विभाग
महाराष्ट्र राज्य, पुणे. मध्यवर्ती कार्यालय,
पुणे : ४११ ००१.

क्रमांक : वि.यो. तुमसर (सु)/टीपीव्ही-२/ ४९६१

महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६.

ज्याअर्थी, तुमसर नगरपरिषदेने (यापुढे "उक्त नगरपरिषद" असे उल्लेखिलेली) महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ (१९६६ चा महाराष्ट्र ३७ वा) (यापुढे "उक्त अधिनियम" असा उल्लेखिलेला) च्या कलम २३(१) आणि ३८ मधील तरतुदींनुसार तुमसर नगरपरिषदेच्या संपूर्ण क्षेत्रासाठी सुधारित विकास योजना तयार करण्याचा इरादा प्रशासकीय आदेश क्रमांक १ दिनांक २३ मार्च, १९८५ अन्वये जाहीर करुन त्याबद्दलची सूचना, महाराष्ट्र शासन राजपत्र, नागपूर विभागीय पुरवणी, भाग-१अ, दिनांक ६ जून, १९८५ मध्ये पृष्ठ क्र. १०० वर प्रसिध्द केली,

आणि ज्याअर्थी, उक्त नगरपरिषदेने तिच्या संपूर्ण हद्दीतील क्षेत्राचे सर्वेक्षण केल्यानंतर सुधारित विकास योजनेचा (यापुढे "उक्त विकास योजना" असे उल्लेखिलेली) प्रारुप आराखडा तयार करुन उक्त अधिनियमाचे कलम २६(१) नुसार दिनांक २० जुलै, १९८८ रोजी प्रकाशित करुन त्यासंबंधीची सूचना दिनांक २० ऑक्टोबर, १९८८ च्या महाराष्ट्र शासन राजपत्रात, नागपूर विभागीय पुरवणी, भाग-१अ मध्ये पृष्ठ क्र. १८० वर प्रसिध्द केली,

आणि ज्याअर्थी, उक्त नगरपरिषदेने उक्त प्रारुप विकास योजनेसंबंधी विहित मुदतीत आलेल्या सूचना/हरकतींचा विचार करुन उक्त अधिनियमाच्या कलम २८ नुसार उक्त प्रारुप विकास योजनेत कांही किरकोळ स्वरुपाचे फेरफार केलेत व अशी प्रारुप सुधारित विकास योजना संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना उक्त अधिनियमाच्या कलम ३०(१) अन्वये मंजूरी मिळण्यासाठी दिनांक २१ मार्च, १९९१ रोजी सादर केली,

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३१ उपकलम (१) मधील तरतुदींनुसार उक्त विकास योजना नियोजन प्राधिकरणाकडून प्राप्त झाल्यापासून एक वर्षाच्या कालावधीत किंवा शासन ठरविल त्या पुढील कालावधीत मंजूर करावयाची असते,

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने नगर विकास विभाग निर्णय क्रमांक : टीपीव्ही-१०८६/३७९१/सीआर-१०३/१/८७/युडी-१७, दिनांक ५ जानेवारी, १९८७ अन्वये "क" आणि "ब" वर्ग नगरपरिषदा तसेच बिगर नगरपरिषद शहरांच्या विकास योजनांना उक्त अधिनियमाच्या कलम ३१ नुसार मंजूरी देण्याबाबतचे अधिकार संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना प्रदान केले आहेत,

आणि ज्याअर्थी, तुमसर नगरपरिषद ही "क" वर्ग नगरपरिषद आहे

२...

— २ —

आणि ज्याअर्थी, उक्त विकास योजनेला अंतिम मंजूरी देण्याची उक्त अधिनियमाचे कलम ३१(१) खालील मुदत संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी अधिसूचना क्रमांक : वि.यो. तुमसर (सु)/टीपीव्ही-२/२११२, दिनांक ९ एप्रिल, १९९२ अन्वये दिनांक ३० सप्टेंबर, १९९२ पर्यंत वाढविली आहे,

आणि ज्याअर्थी, उक्त विकास योजनेतील प्रस्तावांची छाननी करुन सोबतच्या जोडलेल्या किरकोळ फेरफारांच्या अनुसूचिमध्ये नमूद केल्याप्रमाणे कांही किरकोळ स्वरुपाचे फेरफारांसह उक्त विकास योजनेला मंजूरी देण्याचे संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी प्रस्तावित केले आहे,

त्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम ३१(१) नुसार प्रदत्त असलेल्या शासनाच्या अधिकारांचा वापर करुन संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे या अधिसूचनेद्वारे :-

अ) उक्त विकास योजनेला या अधिसूचनेसोबत जोडलेल्या फेरफारांच्या अनुसूचित नमूद केलेल्या फेरफारांसह मंजूरी देत आहेत.

ब) दिनांक १ नोव्हेंबर, १९९२ या दिनांकापासून अंतिम विकास योजना तुमसर (सुधारित) अंमलात येईल असे निश्चित करित आहेत.

टिप्पणी :- वरील प्रमाणे संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी मंजूर केलेली विकास योजना तुमसर नगरपरिषद कार्यालयात कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत एक वर्षाच्या कालावधीसाठी नागरीकांच्या अवलोकनार्थ ठेवण्यात येईल.

फेरफारांची अनुसूचि

१) शासनाला प्रारुप विकास योजना सादर करतांना नियोजन प्राधिकरणाने आरक्षण क्र. ५ मधून वगळून शेती विभागात समाविष्ट केलेली स.नं. ९९३ मधील जमिन विकास योजना नकाशावर नारिंगी रंगाचे किनारीने दर्शविल्याप्रमाणे आरक्षण क्र. ५ "औद्योगिक प्रशिक्षण संस्था" करिता पुन:प्रस्थापित करण्यांत येत आहे. आरक्षण क्र. ५ "औद्योगिक प्रशिक्षण संस्था" चे क्षेत्र सुमारे ६.८८ हेक्टर ऐवढे राहील.

२) आरक्षण क्र. १२ च्या उत्तरेकडील नगरपरिषदेची जमिन विकास योजना नकाशावर नारिंगी रंगाच्या किनारीने दर्शविल्याप्रमाणे ∠ 0.075 हेक्टर " दुकान केंद्र " म्हणून आरक्षित करण्यांत येत आहे.

∠ आरक्षण क्र. ७४

३) विकास योजना नकाशावर नारिंगी रंगाच्या किनारीने दर्शविल्याप्रमाणे आरक्षण क्र. १३ चे नामाभिधान " मनोरंजन केंद्र " ऐवजी " वृध्द विहार पार्क " असे बदलण्यांत येत आहे.

३...

— ३ —

४) विकास योजना नकाशावर नारिंगी रंगाच्या किनारीने दर्शविल्याप्रमाणे आरक्षण क्र. १० चे नामाभिधान " खेळाचे मैदान आणि सहलीचे ठिकाण " ऐवजी " स्टेडियम, उद्यान आणि पोहोण्याचा तलाव " असे बदलण्यांत येत आहे.

५) विकास योजना नकाशावर नारिंगी रंगाचे किनारीने दर्शविल्याप्रमाणे आरक्षण क्र. ११ चे नामाभिधान " व्यायामशाळा " ऐवजी " बालोद्यान " असे बदलण्यांत येत आहे.

६) प्रसिध्द केलेल्या प्रारुप विकास योजनेत दुकान केंद्राकरिता आरक्षीलेले आणि शासनाला प्रारुप विकास योजना सादर करतांना नियोजन प्राधिकरणाने वगळलेले आरक्षण क्र. ८ हे आरक्षण विकास योजना नकाशावर नारिंगी रंगाच्या किनारीने दर्शविल्याप्रमाणे आरक्षण क्र. ८ " दुकान केंद्र " म्हणून पुन:प्रस्थापित करण्यांत येत आहे.

७) आरक्षण क्र. १९ मधील पश्चिमेकडील सुमारे ०.०९ हेक्टर भाग आणि आरक्षण क्र. २० मधील पश्चिमेकडील सुमारे ०.०७ हेक्टर भाग विकास योजना नकाशावर नारिंगी रंगाचे किनारीने दर्शविल्याप्रमाणे रहिवासी क्षेत्रात समाविष्ट करण्यांत येत आहे. आरक्षण क्र. १९ मधील पूर्वेकडील सुमारे ०.३५ हेक्टर भाग आणि आरक्षण क्र. २० मधील पूर्वेकडील सुमारे ०.२१ हेक्टर भाग एकत्र करुन विकास योजना नकाशावर नारिंगी रंगाच्या किनारीने दर्शविल्याप्रमाणे आरक्षण क्र. १९ म्हणून आरक्षित करण्यांत येत आहे. आरक्षण क्र. १९ " बगीचा " चे क्षेत्र सुमारे ०.५६ हेक्टर ऐवढे राहील.

८) विकास योजना नकाशावर नारिंगी रंगाच्या किनारीने दर्शविल्याप्रमाणे आरक्षण क्र. ३० मधील पश्चिमेकडील सुमारे ०.४० हेक्टर भाग आरक्षण क्र. ३० अ " प्राथमिक शाळा " म्हणून आरक्षित करण्यांत येत आहे. तुमसर नगरपालिका आरक्षण क्र. ३० अ " प्राथमिक शाळा " या आरक्षणाकरिता समुचित प्राधिकरण राहील.

विकास योजना नकाशावर नारिंगी रंगाच्या किनारीने दर्शविल्याप्रमाणे पूर्वेकडील सुमारे ०.३८ हेक्टर क्षेत्र आरक्षण क्र. ३० " दवाखाना व प्रसुती गृह " म्हणून कायम ठेवण्यांत येत आहे.

९) नवरगांव रस्त्यापासून नगरपरिषदेच्या वायव्य हद्दीपर्यंतचा २४ मीटर रुंद पूर्व-पश्चिम शासनाला प्रारुप विकास योजना सादर करतांना नियोजन प्राधिकरणाने वगळलेला रिंग रोड विकास योजना नकाशावर नारिंगी रंगाच्या किनारीने दर्शविल्याप्रमाणे पुन:प्रस्थापित करण्यांत येत आहे.

१०) शासनाला प्रारुप विकास योजना सादर करतांना नियोजन प्राधिकरणाने नव्याने प्रस्तावित केलेला नवरगांव रस्त्यापासून नगरपरिषदेच्या वायव्य हद्दीपर्यंतचा २५ मीटर रुंद पूर्व-पश्चिम रस्ता वगळण्यांत येत असून विकास योजना नकाशावर नारिंगी रंगाचे दर्शविल्याप्रमाणे त्याखालील जमिन शेती विभागात समाविष्ट करण्यांत येत आहे.

४...

— ४ —

११) शासनाला प्रारुप विकास योजना सादर करतांना नियोजन प्राधिकरणाने रहिवासी विभागात समाविष्ट केलेली आरक्षण क्र. २६ च्या पश्चिमेकडील स.नं. १८१, १८२, १८३, १८४, १८५ मधील जमिन विकास योजना नकाशावर नारिंगी रंगाच्या किनारीने दर्शविल्याप्रमाणे शेती विभागात समाविष्ट करण्यांत येत आहे.

१२) शासनाला प्रारुप विकास योजना सादर करतांना नियोजन प्राधिकरणाने रहिवासी क्षेत्रात समाविष्ट केलेली आरक्षण क्र. ७२ खालील जमिन विकास योजना नकाशावर नारिंगी रंगाने दर्शविल्याप्रमाणे शेती विभागात समाविष्ट करण्यांत येत आहे.

१३) आरक्षण क्र. ६६ मधील दक्षिणेकडील सुमारे ०.०३४ हेक्टर क्षेत्र " प्राथमिक शाळा " म्हणून दर्शविण्यांत येत आहे. विकास योजना नकाशावर नारिंगी रंगाचे किनारीने दर्शविल्याप्रमाणे आरक्षण क्र. ६६ "दुकान केंद्र " चे क्षेत्र सुमारे ०.०६६ हेक्टर ऐवढे राहील.

१४) आरक्षण क्र. ५२ " आठवडे बाजार " मधील पूर्वेकडील सुमारे ०.३५ हेक्टर क्षेत्र रहिवासी विभागात समाविष्ट करण्यांत येत आहे. शासनाला प्रारुप विकास योजना सादर करतांना नियोजन प्राधिकरणाने वगळलेला उर्वरित/भाग आरक्षण क्र. ५२ " आठवडे बाजार " म्हणून विकास योजना नकाशावर नारिंगी रंगाच्या किनारीने दर्शविल्याप्रमाणे पुन:प्रस्थापित करण्यांत येत आहे.

∠ २.८५ हेक्टर

१५) आरक्षण क्र. ५१ च्या दक्षिणेकडील भाग रस्ता म्हणून दर्शविण्यांत येत आहे आणि विकास योजना नकाशावर नारिंगी रंगाच्या किनारीने दर्शविल्याप्रमाणे आरक्षण क्र. ५१ चे नामाभिधान " नागरी केंद्र " ऐवजी " सिटी सेंटर " असे बदलण्यांत येत आहे. आरक्षण क्र. ५१ "सिटी सेंटर " या आरक्षणाचे क्षेत्र सुमारे १.७२ हेक्टर ऐवढे राहील.

१६) आरक्षण क्र. ५० मधील पूर्वेकडील सुमारे ०.०३ हेक्टर क्षेत्र " प्राथमिक शाळा " म्हणून दर्शविण्यांत येत आहे. विकास योजना नकाशावर नारिंगी रंगाच्या किनारीने दर्शविल्याप्रमाणे आरक्षण क्र. ५० " दुकान केंद्र " चे क्षेत्र सुमारे ०.०६ हेक्टर ऐवढे राहील.

१७) शासनाला प्रारुप विकास योजना सादर करतांना नियोजन प्राधिकरणाने वगळलेला आरक्षण क्र. ४७ मधील उत्तरेकडील भाग आरक्षण क्र. ४७ अ " मृद्द संधारण विभाग " म्हणून पुन:प्रस्थापित करण्यांत येत आहे. विकास योजना नकाशावर नारिंगी रंगाच्या किनारीने दर्शविल्याप्रमाणे आरक्षण क्र. ४७ अ चे क्षेत्र सुमारे ०.१५ हेक्टर राहील आणि या आरक्षणासाठी मृद्द संधारण विभाग हे समुचित प्राधिकरण राहील.

आरक्षण क्र. ४७ मधील दक्षिणेकडील नियोजन प्राधिकरणाने प्रारुप विकास योजना शासनाला सादर करतांना वगळलेला सुमारे ०.४० हेक्टर क्षेत्राचा भाग आरक्षण क्र. ४७ " बगीचा " म्हणून विकास योजना नकाशावर नारिंगी रंगाच्या किनारीने दर्शविल्याप्रमाणे नामाभिधान बदलून पुन:प्रस्थापित करण्यांत येत आहे.

५...

— ५ —

१८) विकास योजना नकाशावर नारिंगी रंगाच्या किनारीने दर्शविल्याप्रमाणे आरक्षण क्र. ४६ " मृद्द संधारण विभागासाठी जागा " वगळण्यांत येत असून त्याखालील जमिन सार्वजनिक निम-सार्वजनिक विभागात समाविष्ट करण्यांत येत आहे.

१९) शासनाला प्रारुप विकास योजना सादर करतांना नियोजन प्राधिकरणाने वगळलेले आरक्षण क्र. ३४ विकास योजना नकाशावर नारिंगी रंगाच्या किनारीने दर्शविल्याप्रमाणे आरक्षण क्र. ३४ " दवाखाना व प्रसुतीगृह " म्हणून पुन:प्रस्थापित करण्यांत येत आहे.

२०) शासनाला प्रारुप विकास योजना सादर करतांना नियोजन प्राधिकरणाने वगळलेले आरक्षण क्र. ३६ विकास योजना नकाशावर नारिंगी रंगाच्या किनारीने दर्शविल्याप्रमाणे आरक्षण क्र. ३६ " उद्यान " म्हणून पुन:प्रस्थापित करण्यांत येत आहे.

२१) शासनाला प्रारुप विकास योजना सादर करतांना नियोजन प्राधिकरणाने वगळलेले आरक्षण क्र. ४४ विकास योजना नकाशावर नारिंगी रंगाच्या किनारीने दर्शविल्याप्रमाणे आरक्षण क्र. ४४ " प्राथमिक शाळा " म्हणून पुन:प्रस्थापित करण्यांत येत आहे.

२२) शासनाला प्रारुप विकास योजना सादर करतांना नियोजन प्राधिकरणाने वगळलेला आरक्षण क्र. ५९ मधील उत्तरेकडील सुमारे २.५८ हेक्टर भाग विकास योजना नकाशावर नारिंगी रंगाचे किनारीने दर्शविल्याप्रमाणे आरक्षण क्र. ५९ " दिवाणी न्यायालय " म्हणून पुन:प्रस्थापित करण्यांत येत आहे.

२३) शासनाला प्रारुप विकास योजना सादर करतांना नियोजन प्राधिकरणाने वगळलेले आरक्षण क्र. ६० आणि आरक्षण क्र. ५९ मधील दक्षिणेकडील सुमारे ०.६२ हेक्टर क्षेत्राचा भाग विकास योजना नकाशावर नारिंगी रंगाच्या किनारीने दर्शविल्याप्रमाणे आरक्षण क्र. ६० " खेळाचे मैदान " म्हणून पुन:प्रस्थापित करण्यांत येत आहे. आरक्षण क्र. ६० "खेळाचे मैदान " चे क्षेत्र सुमारे १.१० हेक्टर ऐवढे राहील.

२४) शासनाला प्रारुप विकास योजना सादर करतांना नियोजन प्राधिकरणाने वगळलेले आरक्षण क्र. ६२ विकास योजना नकाशावर नारिंगी रंगाचे किनारीने दर्शविल्याप्रमाणे आरक्षण क्र. ६२ " प्राथमिक शाळा " म्हणून पुन:प्रस्थापित करण्यांत येत आहे.

२५) शासनाला प्रारुप विकास योजना सादर करतांना नियोजन प्राधिकरणाने वगळलेले आरक्षण क्र. ६७ विकास योजना नकाशावर नारिंगी रंगाच्या किनारीने दर्शविल्याप्रमाणे आरक्षण क्र. ६७ " बगीचा " म्हणून पुन:प्रस्थापित करण्यांत येत आहे.

६...

— ६ —

२६) भंडारा रोड आणि कृषि उत्पन्न बाजार समिती या मधील खसरा क्र. १०३५ मधील जमिन विकास योजना नकाशावर नारिंगी रंगाचे किनारीने दर्शविल्याप्रमाणे "कृषि उत्पन्न बाजार समितीचा विस्तार " म्हणून दर्शविण्यांत येत आहे.

२७) विकास योजना नकाशावर नारिंगी रंगाचे किनारीने दर्शविल्याप्रमाणे आरक्षण क्र. ६३, ६४, ६५ च्या उत्तरेकडील १५ मीटर रुंद रस्ता वगळण्यांत येत असून त्याखालील जमिन रहिवासी विभागात समाविष्ट करण्यांत येत आहे.

२८) विकास योजना नकाशावर नारिंगी रंगाच्या किनारीने दर्शविल्याप्रमाणे शासनाला प्रारुप विकास योजना सादर करतांना नियोजन प्राधिकरणाने वगळलेला आरक्षण क्र. ६२ पासून १८ मीटर रुंद रस्त्यापर्यंतचा उत्तर-दक्षिण १५ मीटर रुंद रस्ता पुन:प्रस्थापित करण्यांत येत आहे.

२९) शासनाला प्रारुप विकास योजना सादर करतांना नियोजन प्राधिकरणाने वगळलेला नवरगांव रोडपासून आरक्षण क्र. ४५ पर्यंतचा २५ मीटर रुंद उत्तर-दक्षिण रिंग रोड विकास योजना नकाशावर नारिंगी रंगाचे किनारीने दर्शविल्याप्रमाणे पुन:प्रस्थापित करण्यांत येत आहे.

३०) प्रारुप विकास योजना शासनाला सादर करतांना नियोजन प्राधिकरणाने वगळलेला स.नं. १२१९ पासून सालई रोडपर्यंतचा २५ मीटर रुंद रिंग रोड विकास योजना नकाशावर नारिंगी रंगाचे किनारीने दर्शविल्याप्रमाणे पुन:प्रस्थापित करण्यांत येत आहे.

३१) शासनाला प्रारुप विकास योजना सादर करतांना नियोजन प्राधिकरणाने नव्याने प्रस्तावित केलेला २५ मीटर रुंद रिंग रोड विकास योजना नकाशावर नारिंगी रंगाचे किनारीने दर्शविल्याप्रमाणे वगळण्यांत येत असून त्याखालील जमिन प्रसिध्द केलेल्या प्रारुप विकास योजनेतील प्रस्तावित वापरासाठीच्या क्षेत्रात समाविष्ट करण्यांत येत आहे.

३२) प्रसिध्द केलेल्या प्रारुप विकास योजनेत औद्योगिक क्षेत्रात समाविष्ट असलेली, शासनाला प्रारुप विकास योजना सादर करतांना नियोजन प्राधिकरणाने रहिवासी क्षेत्रात समाविष्ट केलेली रेल्वे स्टेशन रस्ता, २५ मीटर रिंग रोड, रेल्वे मार्ग आणि नगरपरिषदेची आग्नेय हद्द या मधील जमिन विकास योजना नकाशावर नारिंगी रंगाचे किनारीने दर्शविल्याप्रमाणे औद्योगिक क्षेत्रात समाविष्ट करण्यांत येत आहे.

३३) शासनाला प्रारुप विकास योजना सादर करतांना नियोजन प्राधिकरणाने रहिवासी क्षेत्रात समाविष्ट केलेली नगरपरिषदेच्या दक्षिण हद्दीजवळील स.नं. ११९१ मधील जमिन विकास योजना नकाशावर नारिंगी रंगाच्या किनारीने दर्शविल्याप्रमाणे शेती विभागात समाविष्ट करण्यांत येत आहे

७...

— ७ —

३४) शासनाला सादर केलेल्या प्रारुप विकास योजनेत दर्शविलेली दाट लोकवस्तीचे क्षेत्राची हद्द रद्द करण्यांत येत आहे आणि दाट लोकवस्तीच्या क्षेत्राची हद्द नारिंगी रंगाच्या किनारीने दर्शविण्यांत येत आहे.

३५) विकास योजना नकाशात नारिंगी रंगाच्या किनारीने दर्शविल्याप्रमाणे आरक्षण क्र. १४ मधील पश्चिमेकडील सुमारे ०.३० हेक्टर भाग आरक्षणातून वगळून रहिवासी विभागात समाविष्ट करण्यांत येत आहे. आरक्षण क्र. १४ " प्राथमिक शाळा " या आरक्षणाचे क्षेत्र सुमारे ०.३५ हेक्टर ऐवढे राहील.

३६) शासनाला प्रारुप विकास योजना सादर करतांना नियोजन प्राधिकरणाने वगळलेला भंडारा रस्त्यापासून स.नं. १०८४ च्या पूर्व हद्दी पर्यंतचा १२ मीटर रुंद रस्ता विकास योजना नकाशावर नारिंगी रंगाच्या किनारीने दर्शविल्याप्रमाणे पुन:प्रस्थापित करण्यांत येत आहे.

३७) शासनाला प्रारुप विकास योजना सादर करतांना नियोजन प्राधिकरणाने वगळलेला आरक्षण क्र. ५५ मधील दक्षिणेकडील सुमारे १.६० हेक्टर भाग विकास योजना नकाशावर नारिंगी रंगाच्या किनारीने दर्शविल्याप्रमाणे आरक्षण क्र. ५५ " समाज कल्याण विभाग " म्हणून पुन:प्रस्थापित करण्यांत येत आहे. आरक्षण क्र. ५५ चे क्षेत्र सुमारे १.६० हेक्टर ऐवढे राहील.

३८) शासनाला प्रारुप विकास योजना सादर करतांना नियोजन प्राधिकरणाने वगळलेला आरक्षण क्र. ५३, ५४, ५५ मधील पूर्वेकडील सुमारे १.०० हेक्टर क्षेत्राचा भाग विकास योजना नकाशावर नारिंगी रंगाच्या किनारीने दर्शविल्याप्रमाणे आरक्षण क्र. ५३ " प्राथमिक शाळा व खेळाचे मैदान " म्हणून पुन:प्रस्थापित करण्यांत येत आहे. आरक्षण क्र. ५३ " प्राथमिक शाळा व खेळाचे मैदान " चे क्षेत्र सुमारे १.०० हेक्टर ऐवढे राहील.

३९) प्रसिध्द केलेल्या प्रारुप विकास योजनेत सफाई कामगारांच्या वसाहती करिता आरक्षिलेले आणि शासनाला प्रारुप विकास योजना सादर करतांना नियोजन प्राधिकरणाने वगळलेले आरक्षण क्र. १७ हे आरक्षण विकास योजना नकाशावर नारिंगी रंगाचे किनारीने दर्शविल्याप्रमाणे आरक्षण क्र. १७ " सफाई कामगार वसाहत " म्हणून पुन:प्रस्थापित करण्यांत येत आहे.

४०) प्रसिध्द केलेल्या प्रारुप विकास योजनेत "उद्याना करिता आरक्षिलेले आणि शासनाला प्रारुप विकास योजना सादर करतांना नियोजन प्राधिकरणाने वगळलेले आरक्षण क्र. २७ हे आरक्षण विकास योजना नकाशावर नारिंगी रंगाचे किनारीने दर्शविल्याप्रमाणे आरक्षण क्र. २७ " उद्यान " म्हणून पुन:प्रस्थापित करण्यांत येत आहे.

८...

— ८ —

४१) नगरपरिषद कार्यालयाच्या आवाराच्या पूर्व आणि दक्षिण हद्दी लगतची आवारातील जमिनीची पट्टी विकास योजना नकाशावर नारिंगी रंगाच्या किनारीने दर्शविल्याप्रमाणे ∠ " दुकान केंद्र " म्हणून दर्शविण्यांत येत आहे.

∠ ०.०६० हेक्टर
× आरक्षण क्र. ७३

पुणे : ४११ ००१.
दिनांक : २० ऑगस्ट, १९९२.

(गुणवंत मदामे)
संचालक, नगर रचना,
महाराष्ट्र राज्य, पुणे.